## प्रकरण - पहिले

## प्रकरण पहिले

## ग्रामीण साहित्याचे स्वरुप आणि त्यातील प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे स्थान

**प्रस्तावना -**

या प्रकरणात ग्रामीण साहित्याचे अंत:स्वरुप आणि त्यातील प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे स्थान व 1920 सालानंतर महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण आणि साहित्यकारण परस्परावंलबी कसे झाले व म. फुल्यांनी ज्ञानाची ओळख करुन दिलेला समाज आणि म. गांधीच्या नेतृत्वाने आत्मतेज होऊन झळाळून उठलेला समाज हा आपल्या नव्या जाणीवा शब्दबध्द कसे करु लागला, याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

ग्रामीण साहित्यनिर्मिती ही वास्तवाचा अनुभव आणि त्यात घोळून आलेले कल्पनेचे रंग त्यांच्या संगमातून प्रकटते त्यामध्ये केवळ सत्यकथन हे रुक्ष वार्षिक अहवालासारखे असते. पण मनाला गुंगवून ठेवणा-या त्या कथनाला कलेचा स्पर्श कुठे झाला, ते कधी कधी जाणवतही नाही. तरीही वाचकापुढे जे उभे राहते ते कधी स्वस्थ करणारे, कधी अस्वस्थ करणारे, कधी सुखावणारे, कधी खूप दुखावून जाणारे असे नाना प्रकारच्या भाववृत्तींचा कल्लोळ उत्पन्न करणारे एक शब्दशिल्पच होय.

मराठी साहित्याच्या सुदैवाने हा भाषेचा घोंगडीसारखा पोत मराठीला आता नवा नाही. सुबक आणि शारीरिक कष्टांनी आणि भयानक दारिद्रयामुळे जिथे परोपरी कातडी सोलली जाण्याचे भय नव्हते अशा जीवनातल्या सुख दु:खाची आणि अशा आकांक्षांची वस्त्रे विणत आलेल्या साहित्यिक परंपरेच्या आशय आणि अभिव्यक्ती विषयक रुढ कल्पनांना जबरदस्त तडाखे देणारे असे एक वादळ ग्रामीण साहित्याच्या रुपाने मराठी साहित्यात आले. जी ग्रामीण भाषा नाटकाबिटकातून विनोदापुरती वापरली जायची, ती आपल्या जीवनाच्या वाताहतीची कहाणी समर्थपणाने सांगताना आढळायला लागली. ग्रामीण साहित्यातील उपेक्षेच्या अंधारात ठेचकाळणा-या समाजाचा अर्थ, दैन्य, दारिद्रयापोटी क्षणाक्षणाला कोसळणारे आघात सोशीत किंवा सारे बळ एकवटून तात्पुरते टाळीत किंवा मरणा-या वाटेपर्यंतचा प्रवास करणे एवढाच होता, अशा माणसांचे ओझरते दर्शनही साहित्यात होत नव्हते. सुखवस्तू जीवनात साहित्याची निर्मिती आणि आस्वाद या दोन्ही क्रियाकडे फावल्या वेळातही करमणूक म्हणूनच पाहिले जायचे. शिवाय अशा उपेक्षितांचे आणि शोषितांचे जीवन कंठणा-या सत्तरऐंशी टक्के प्रजेची, साध्या शब्दांच्या सहानुभूतीपुरती देखील दखल घेतल्याशिवाय, समाजातल्या एका वर्गाला शतकानुशतके

सुखवस्तू पध्दतीने जगता येत होत. त्यातून दैन्य, दारिद्रय, उपासमार, शोषितांच्या कुळात जन्माला येणे वगैरे, पूर्वजन्मातल्या कर्माची फळे असल्याची शिकवणही देण्यात येत होती ती देखील मोठया चतुराईने आणि वेळी प्रसंगी दंडुक्यांचा वापर करुनही हया समाजात एक उच्चनीचतेची उतरंड करून ठरविण्यात आली होती. त्यामुळे जीवन फुलवणा-या, आनंद देणा-या, सौंदर्यपूर्ण अशा गोष्टी भोगण्याचा आपल्याला मुळात हक्कच नाही अशी ही, विपन्नावस्था भोगण्या-या समाजाचीही पक्की धारणा होती. मालक पुढयात टाकेल त्या कडब्याचेच काय ते आपण धनी, असे गोठयातल्या बैलाने मानून तो घास पोटात ढकलावा, तितक्याच असहायतेने भाकरीचा जो ताजा किंवा शिळा तुकडा ताटात पडेल तोच आपल्या नशिबी लिहिलेला आहे असे मानून, वर्षानुवर्षे जगत होता म्हणजेच मालकासाठी राबत आलेला असा संख्येने प्रचंड असणारा एक वर्ग होता, आजही आहे. शतकानुशतके दारिद्रयामुळे शोषण आणि शोषणामुळे दारिद्रय अशा यातनाचक्रात असंख्य माणसांची आयुष्ये फिरत राहिली आहेत. वयाच्या कुठल्याही वर्षी मरण आले तरी 'सुटला' किंवा 'सुटली', खायला मागणारे एक तोंड कमी झाले - हया खेरीज भोवतालच्या माणसांची दुसरी कुठलीही प्रतिक्रिया होऊ नये, अशा अवस्थेत जगणा-या माणसांच्या दु:खाचा हुंदकाही कालपरवापर्यंतच्या मराठी साहित्यातून उमटलेला ऐकू आला नव्हता. ही असंख्य माणसे आपल्या दु:खाच्या कथा पोटातच ठेवून, माटे मास्तरांच्या सावित्रीसारखी मुक्यानेच मेली. पोराला शाळेत पाठवणे ही गोष्टच मुळी जिथे न परवडणा-या चैनीत जमा होत होती, तिथे हाती लेखणीच आली नाही. परंपरागत संस्काराचा पगडा इतका जबरदस्त होता की, आपले हात हे देवाने नांगर, खराटा किंवा असलीच सतत अपार कष्टांची मागणी करणारी अवजारे धरण्यासाठीच निर्माण केले आहेत. आणि लेखणी धरणारा हात देवानेच आपल्याला नाकारलेला आहे, ही दृढ समजूत होती. दिवसभर अन्नाच्या शोधात फिरणारी जनावरे आणि ही माणसे हयांच्या जगण्यात फरक नव्हता. जगण्यांच सांर प्रयोजन भूक भागवायला हव्या असलेल्या भाकरी भोवती साठलेलं होत. हे जळजळीत वास्तव, एखादा पडदा टर्रकन फाडून त्या मागचे भयानक दृश्य प्रेक्षकाला दाखवाव तसे, 'शेतक-यांच्या आसूडा' त म. ज्योतिबा फुल्यांनी शिक्षित समाजाला दाखवले. वास्तविक ज्योतिबा हे काही ललित लेखक नव्हते पण त्यांनी शेतक-यांच्या झोपडीतल्या दारिद्रयाचे शब्दांनी जे चित्र काढले आहे त्याला तोड नाही. त्या खोपटातली प्रत्येक जीर्णशीर्ण, फुटकी-तुटकी वस्तू आणि गाडगी-मडकी जर वाचा फुटून बोलायला लागली तर शेतक-याच्या दुरवस्थेचे महाभारत सांगून जातील असे वाटायला लागते. इथे त्या लेखनामागल्या ज्योतिबांच्या उत्कटतेतून त्या वर्णनाला कवितेसारखी गती आली आहे. त्या गद्य ओळीसुध्दा ओवीसारख्या मनात पाझरत जातात आणि वस्तीला राहतात. 'समाज' हया शब्दाबद्दलची

पांढरपेशा समाजाची सारी संकुचित आणि आत्मतुष्ट धारणा कोसळून टाकण्याचे सामर्थ्य असलेले, हे दिसायला छोटेसे असणारे पुस्तक आहे. एखाद्या युध्दाआधी रणशिंग फुंकावे तसे 'शेतक-याचा आसूड' हे समाज प्रबोधनाच्या युध्दाआधी फुंकलेले रणशिंग आहे असे या साहित्यातून स्पष्ट दिसते.

सतत सहन कराव्या लागणा-या दारिद्रयातून निर्माण झालेल्या हालअपेष्टांमुळे मनाची सारी उभारी नष्ट झालेल्या बहुजन समाजात, 'आपले जीवन हे असे का झाले ?' हयाचे कारण सांगून, एक नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य म. फुल्यापासून महाराष्ट्रात सुरु झाले. ' विद्या नसल्यामुळे सारे आयुष्य नासल्याची' त्यांनी जाणीव करुन दिली आणि जी हाती न धरल्यामुळे ही दुरवस्था प्राप्त झाली ती लेखणी आणि नाना विषयांचे ज्ञान हाती आणून देणारे पुस्तक स्वतःच्या हातात घ्यायला त्यांनी शेतकरी आणि शरीरश्रम करणा-या समाजाला उदयुक्त केले. स्त्रिया आणि शेतक-यांची पोरे हयांना शाळेची वाट दाखवण्याचे कार्य करणे ही केवढी प्रचंड क्रांती होती याची आज कल्पना येणार नाही. पण शेतक-यांच्या झोपडीत पाटी-पेन्सिलीने ज्या क्षणी प्रवेश केला तो खरा क्रांतीचा प्रारंभ मानायला हवा.

एखाद्या लेखकाच्या वाटयाला माणसामाणसांतला जिव्हाळा कधी आलाच नाही, तो आपली चित्तर कथा दोन प्रकारांनी सांगतो. एक म्हणजे, ऐकणाराच्या मनात कणव उत्पन्न करण्यासाठी किंवा कथनाची दुसरी पध्दत म्हणजे, विलक्षण कोरडेपणाची. पण कुठेही स्वतःला भावविवश होऊ न देता, वाचकाच्या डोळयात सहानुभूतीचे अश्रू उभे करण्याच्या फंदात न पडता, त्याच्या मनाला जडलेला सारा सुखवस्तूपणा आणि आत्मसंतुष्टता उखडून टाकायची शक्ती असलेला हा कोरडेपणा, शोषितांच्या जगाचे दर्शन घडवणा-या लेखकांनी केवळ एक शैलीचा प्रकार म्हणून स्वीकारलेला नाही त्यामागे ' आम्हाला कुणाची दया नको. चांगल्या रीतीने जगण्याचा आमचा प्राथमिक हक्क हिरावून घेणारी आजची समाजपरिस्थिती, आमच्या जीवनाची काय परवड करुन गेली आहे, ते पहा. ही समाज व्यवस्था आम्ही बदलल्याशिवाय राहणार नाही' हे सांगणारी फुले - आंबेडकरांची प्रेरणा आहे. आर्थिक शोषणावर आणि ते शोषण व्यवस्थितपणाने चालू राहावे म्हणून त्या शोषितांना धर्म-रुढी, स्वर्ग-नरक वगैरे कल्पनांच्या दलदलीत रुजवून ठेवायला साहाय्य करणा-या परंपरांवर आधारलेली, ही पृथ्वीवरच निर्माण केलेली नरकवासासारखी परिस्थिती आहे. सतत दयेवर तरी किंवा टाचेखाली रगडून घेत खाली मान घालून तरी जगायची शतकानुशतके सवय झालेल्या समाजाला आपल्या हक्कांची जाणीवच नव्हती. म. फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी ' दया ' हा शब्दच उखडण्यापासून लढयाला सुरुवात केली आणि अश्रूंची हकालपट्टी झाली. त्यातूनच सत्य

परिस्थितीच्या दर्शनात हा वाचकाच्या मनात टोकदार सळीसारखा शिरणारा कोरडेपणा आला. ' ' मला काय त्याचं ?' अशा आत्मसंतुष्ट वृत्तीने डोळयावर कातडे ओढीत जगणा-या समाजाला जोरदार हादरा देणे आवश्यक होते. फुले, आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे हा एक वैचारिक भूकंप होता. त्या धक्क्याने सुखवस्तू समाजातलीही संवेदनशील अशी जी मने होती ती हादरली. त्या भीषण वास्तवाच्या दर्शनाचे कधी मनोमन ओशाळली, तर कधी एक नवी दृष्टी लाभल्याबद्दल त्या साहित्याकडे कृतज्ञतेच्या भावनेने पहायला लागली.

ग्रामीण जीवनातल्या हया दु:स्थितीच्या दर्शनाचे दार मराठी साहित्यात प्रथम कोणी किलकिले केले असेल तर ते श्री. म. माटयांनी. आज ग्रामीण विभागातून आलेल्या उपेक्षित समाजातल्या लेखकांच्या साहित्यकृती माटयांनी पाहिल्या असत्या तर, 'याचिसाठी केला होता अट्टाहास' असेच त्यांनी म्हटले असते. ललित साहित्यात भर घालावी म्हणून माटयांनी उपेक्षितांच्या कथा लिहिल्या नाहीत', तर उपेक्षेच्या अंधारात वर्षानुवर्षे खितपत पडलेल्या एका प्रचंड मराठी समाजाची साहित्यात नोंद न होता वापरलेल्या, महाराष्ट्र, मराठी, मराठी जीवन वगैरे शब्दांची व्याप्ती किती संकुचित समाजापुरती आहे, याची जाणीव करुन देणे हे त्यांना अधिक अगत्याचे वाटले होते. पांढरपेशा समाजाचे त्यांनी उपेक्षितांच्या जीवनाकडे लक्ष वेधून घेतले. पण माटयांना संघर्षापेक्षा सुधारणेची तळमळ अधिक होती. उपेक्षित समाजाला आधी शिकवून शहाणे करायला हवे अशी त्यांची विचारसरणी होती.

त्याचकाळात ग्रामीण भागात कर्मवीर भाऊराव पाटलांनीही खेडोपाडी शाळा नेण्यासाठी जिवाच रानं केलं.

लेखणी आणि शब्द हयांच्या असामान्य सामर्थ्याचा जिथे काहीच अनुभव नव्हता अशा ठिकाणी राहणा-या, भौगोलिक आणि मानसिक अशा दोन्ही दृष्टीने सांस्कृतिक चळवळीच्या केंद्रस्थानापासून दूरदूरच्या कोप-यात राहणा-या लेखकांनी, अंगात नव्या चैतन्याचा संचार व्हावा अशा उत्साहाने लेखन करायला सुरुवात केली. ग्रामीण विभागातून येणा-या हया साहित्याच्या लोंढयाने प्रथम जर काही वाहून नेल असेल, तर केवळ विरंगुळा किंवा करमणूक एवढयाच माफक अपेक्षेने पुस्तकाकडे पाहणा-या वाचकाची आत्मसंतुष्टता होय.

ग्रामीण साहित्यातील कथा - कादंब-या वाचकांना अस्वस्थ करुन जाणा-याच असतात, कारण आजच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत अस्वस्थ होऊन घुमसणे हाच तिथल्या

जीवनाचा स्थायीभाव आहे. त्या अस्वस्थपणाचा स्फोट मराठी ग्रामीण साहित्यात सुरु झाला आहे.

ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण आणि साहित्य अशा दोन संज्ञा मोडतात, ग्रामीण म्हणजे अज्ञात, रुढीप्रियता, दारिद्रय, मागासलेपणा असे सर्वसामान्यपणे म्हटले जाते. पण या सर्व बाबी सापेक्ष आहेत. तशा त्या शहरी जीवनालाही सापडू शकतात. तेव्हा ही लक्षणे म्हणजे ग्रामीणत्व असे होयू शकत नाही तर साहित्यामध्ये प्रादेशिक साहित्य आणि ग्रामिण साहित्य या दोन्हीत साम्य आणि भेद आहेत. ग्रामीण जीवनाची धारणा ज्या सुत्रान्वये झाली आहे, ती सुत्रे कोणती याचा विचार महत्वाचा आहे. ग्रामीण समाजामध्ये कृषी केंद्रीत निसर्ग सन्मुख आणि आदी मते संवाद साधू पहाणारी स्वतंत्र अशी व्यवस्था असते. ती म्हणजे ग्रामीण व्यवस्था होय. त्याचप्रमाणे एका विशिष्ट भौगोलिक पट्टयावरील समाज जीवन प्रादेशिक साहित्याच्या दृष्टीने महत्वाचे असते. अशा ग्रामीण साहित्यामध्ये प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा सिंहाचा वाटा आहे.

वरील अभ्यासासाठी खालील विषय निवडलेला आहे.

अभ्यास विषयाचे शीर्षक -

'चंद्रकुमार नलगे यांच्या कादंबरी लेखनाचा अभ्यास' सदरचा अभ्यास त्यांनी लिहिलेल्या देवाची साक्ष आणि अगीनफूल या कादंबरीच्या आधारे करण्यात आलेला आहे. या अभ्यासातून ग्रामीण साहित्याचे स्वरुप आणि त्यातील प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या स्थानांचा विचार त्यांनी लिहिलेल्या देवाची साक्ष आणि अगनिफूल या कादंबरीच्या आधारे करण्यात आलेला आहे.

या विषयाचा अभ्यास करत असताना खालील उद्दिष्टे नजरेसमोर ठेवलेली आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे -

1. ग्रामीण साहित्याचे स्वरुप अभ्यासणे.
2. ग्रामीण साहित्यामध्ये प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या स्थानाचा विचार करणे.
3. प्रा. चंद्रकुमार नलगे यांचा परिचय करुन घेणे.
4. देवाची साक्ष आणि अगीनफूल या ग्रामीण साहित्याच्या कादंबरीतील आशयाचा रसास्वाद करुन घेणे.
5. देवाची साक्ष आणि अगीनफूल या ग्रामीण साहित्याच्या कादंब-याचे रुपबंधनात्मक समीक्षण करणे.

6. प्रा. चंद्रकुमार नलगे याच्या कादंबरी लेखनाच्या अभ्यासातून प्राप्त झालेले निष्कर्ष मांडणे.

संशोधनाची वरील उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणात ग्रामीण साहित्याचे स्वरुप आणि त्यामधील प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या स्थानाचा विचार करण्यात आलेला आहे.

**ग्रामीण साहित्याचे स्वरुप :-**

'ग्रामीण साहित्य' ही संज्ञा रुढ होऊन आता कितीतरी काळ लोटला आहे. ग्रामीण विशेषणाने वलयकिंत झालेले साहित्यही विपुल प्रमाणात निर्माण होत आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा, स्वरुप किंवा समस्या यांचे सविस्तर वर्णन करणारी समीक्षाकृती आजही उपलब्ध नाही. ग्रामीण साहित्याच्या तुलनेने दलित साहित्याची निर्मिती नंतर झाली तरी दलित साहित्यावर चार-सहा ग्रंथ निर्माण व्हावेत. परंतु ग्रामीण साहित्याचा परामर्ष घेणारा एकही ग्रंथ आजवर उपलब्ध होऊ नये, हे चमत्कारिकच आहे. ग्रामीण साहित्य समीक्षेच्या तीव्र उपेक्षेची कारणे मात्र नीटशी न उमगणारी, ग्रामीण साहित्य हे पृथगात्म न मानता मध्यवर्ती मराठी साहित्याचीच ती एक रेषा मानली हा एक परिणाम असावा. कारणे कोणतीही असली तरी या ग्रामीण साहित्याची समीक्षा दृष्टया आबाळच झाली. ग्रामीण जीवन हे वेगळे जीवन आहे ही जाणीवही त्याच्या पाठीमागे दिसत नाही. जीवनातील अनेक समस्यांवर व वस्तुस्थितीवर भर देऊन जसे इतर वाड:मय जन्माला येत होते. त्याच सर्वसाधारण प्रेरणेतून हे वाड:मयही जन्माला आले होते. 1920 नंतर ही परिस्थिती बदलली. राजकीय परिस्थितीत झालेल्या स्थित्यंतराचा परिणाम सामाजिक दृष्टीवरही झाला. म. गांधीजींची दृष्टी राजकारणासह सर्व जीवनाला व्यापणारी होती. याचवेळी साम्यवादी, समाजवादी दृष्टीचेही आगमन होऊन त्यांचे मंथन सुरु झाले. गांधीजीनी खेडयांचे भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणीवांसह पटवून दिले.

मराठीत ग्रामीण साहित्याची निर्मिती सर्वसाधारण 1925 पासून सुरु झाली. 1925 च्या पूर्वी मराठी वाड:मयात ग्रामीण जीवनाचे दर्शन आपणास सापडणार नाही असे नाही व जाणीवपूर्वक ग्रामीण जीवनदर्शन घडवण्याचा प्रयत्न मराठीत सुरु झाला तो 1925 पासूनच. सुरुवातीला ग्रामीण जीवनदर्शन घडवण्याचा प्रयत्न कवितेमधून सुरु झाला.

उदा. मीठ - भाकर, ग.ल. ठोकळ.
सुगी - कवी गिरीश.

या कविता संग्रहातून असे ग्रामीण जीवन संग्रहीत केलेले आहे.

'रविकिरण मंडळकालीन कविता' या लेखात ग्रामीण साहित्याची ही उगमस्थळे स्पष्ट होतात. मराठी ललित साहित्यात ग्रामजीवन लोकप्रिय झाले ते आधुनिक कवीच्या ' जानपद ' कवितामार्फत. या आधुनिक कवींनी ग्रामजीवनाची किंवा तेथील निसर्गाची भेट थेटपणे न घेता, ती इंग्रजीतील' Pastoral Poetry ' च्या माध्यमातून घेतली गेली. मराठीत अशी कविता 'गोप गीते' 'किसानगीते' या नावांनी ओळखली जात. व यानंतर रविकिरण मंडळाच्या काळात ती जानपद गीते म्हणून ओळखली जावू लागली. यानंतर मात्र ग्रामीण जीवनदर्शन कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारातून येऊ लागले. आज बरेचसे वाङ्मय ग्रामीण वाङ्मय म्हणून असरु लागले आहे.' (1).

1925 ते 30 या काळात ग्रामीण साहित्याबरोबरच प्रादेशिक साहित्य या साहित्याच्या निर्मितीला या सुमारासच प्रारंभ झाला. 1927 - 28 पासून प्रादेशिक जीवनाचे चित्रण वाङ्मयातून प्रकट होवू लागले. वि.स. सुखटणकर हे पहिले प्रादेशिक कथाकार म्हणून ओळखले जातात. 'सहयाद्रीच्या पायथ्याशी' अर्थात 'आजकालचा गोमंतक' हा त्यांचा पहिला कथा संग्रह 1931 साली प्रसिध्द झाला' (2). आणि त्यानंतर आजतागायत प्रादेशिक साहित्याची अखंड अशी निर्मिती होवू लागली. म्हणजेच प्रादेशिकता ही ग्रामीण परिसराशी आजपर्यंत अविभाज्यपणे निगडित झालेली आहे. ग्रामीण परिसर हा अद्याप ही औदयोगिक शहरी संस्कृतीपासून बराचसा अलिप्त राहिलेला आहे. त्यामुळे त्याची प्राकृतिक वैशिष्टये अजून ब-याच प्रमाणात अ-विकृत राहिलेली दिसतात.

1931 ते 40 या काळात लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या कथांमधून सुखटणकरांच्या तुलनेने अधिक वाङ्मयीनता दिसून येते. सरदेसाई यांचे 1940 साली 'ढासळलेले बुरुज' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला.

1941 ते 50 या काळात श्री. म.माटे यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा संग्रह प्रसिध्द झाला. आणि मराठी ग्रामीण कथेला नवे धुमारे, नव्या जाणीवा पालवल्या. 1945 च्या आसपास ग्रामीण कथा वेगवेगळया प्रेरणांनी लिहिली जात होती. ग्रामीण विश्वातून व्यंकटेश माडगूळकर, गोखले, भावे असे नव्या दमाचे कथालेखक पुढे आले. 1951 ते 55 काळात नव्या चाकोरीतील व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथा - कादंबरी या पार्श्वभूमीवर लिहिली. त्यांचे साहित्य आगळेच तेज घेऊन जन्माला आले आणि ग्रामीण साहित्यात नवे पर्व सुरु झाले.

1955 ते 70 या पंधरा वर्षाच्या काळात प्रचंड पिढी आज ग्रामीण साहित्यात निर्माण

झाली. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशातील आणि ग्रामीण समाजाच्या अनेक थरातील लेखक आज सातत्याने लेखन करताना दिसत आहेत.

1975 नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ आकारास आलेली दिसते. याचा अर्थ यापूर्वी ग्रामीण साहित्याचा प्रवाह आस्तित्वात नव्हता असे नाही. दलित साहित्य चळवळीप्रमाणे ग्रामीण साहित्याची चळवळ हे एक सांस्कृतिक उत्थान आहे. त्याच्या प्रेरणा थेट म. फुले, कृष्णराव भालेकर यांच्या साहित्यात शोधाव्या लागतात. म. फुल्यांनी प्रथमच 'शेतक-याचा आसूड' हे पुस्तक लिहून खेडयापाडयात पसरलेल्या दीन-दुबळया, कष्टकरी समाजाची स्थिती आणि व्यथा शब्दांकित केली. भालेकरांनी 'बळीबा पाटील' ही कादंबरी लिहून 1888 मध्येच ग्रामीण साहित्याची मुर्हुतमेढ रोवली. 'शेतक-याचा असूड' हा ग्रंथ वैचारिक स्वरुपाचा असला तरी त्यात ललित साहित्याची वैशिष्टये आहेत. हा ग्रंथ वाचत असताना काही ठिकाणी आपण ग्रामीण कादंबरी वाचत आहोत असे वाटते. असे फुले साहित्याचे अभ्यासक डॉ. स.ग. मालशे यांनी म्हटले आहे. परंतु त्यांच्या साहित्याचा साहित्य म्हणून विचार झाला नाही ही वस्तूस्थिती डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी दाखवून दिली आहे. ग्रामीण बहुजन समाजाचे जीवन शब्दरुप करणारा एका नव्या वाङ्मय परंपरेचा उद्गाता साहित्यिक म्हणून म. फुले यांचे स्थान लक्षणिक आहे.

शेतक-याचा असूड, बळीबा पाटील, पिराजी पाटील हे नवोन्मेष प्रकट होऊनही आंग्लविदयाविभूषित उच्चभू साहित्यिकांना त्यांची दखल घ्यावीशी वाटली नाही. हे वर्णवर्चस्ववादी वृत्तीतून निर्माण झालेले सांस्कृतीक करंटेपण होते. संत शाहीरांच्या परंपरा विसरुन साहेबाच्या बूटपाटलोणीच अनुकरण करण्यात धन्यता मानणा-या आणि बहुजन समाजाला कनिष्ट म्हणून कमी लेखणा-या तत्कालिन सुशिक्षितांच्या वृत्तीशी हे सुसंगतच होते. दलित, पिडित बहुजन समाजाच्या व्यथा, वेदना ज्या समाजाने कधीही समजून घेतल्या नाहीत, त्याच्याकडून ही अपेक्षा बाळगणेही व्यर्थ होते. वस्तुतः एकूणच मराठी साहित्याला लोक साहित्याच्या आणि संत साहित्याच्या समृध्द आणि लोकाभिमुख परंपरा होत्या. इंग्रजी आगमनानंतरची आधुनिकता घडविताना ही जुनी भूमी नांगरुन त्यातील श्रेयस्कर घेऊन त्यावर नव्याचे कलम केले असते. आणि समावेशक साहित्य परंपरा घडविल्या गेल्या असत्या तर आज दिसणारे दलित जाणीवा, ग्रामीण जाणीवा, शहरी मध्यमवर्गीय जाणीवा हे भेद दिसले नसते. परंतु या भेदांचे मूळ वरील परिस्थितीत आणि येथील सामाजिक उतरंडीत दडलेले आहे. वर्णवर्चस्व वादयांना अन्नदात्या साहेबाचे बरेवाईट जे असेल ते

स्वीकारावेसे वाटले. परंतु बहुजन समाजाच्या वाङ:मय परंपरा स्वीकारणे योग्य वाटले नाही. परिणामी वरील भेद अटळ होते. आज दलित साहित्या पाठोपाठ ग्रामीण साहित्याच्या प्रवाहानेही सामाजिक परिवर्तनाच्या नव्या दिशा हेरून आणि त्यातील साहित्याची जबाबदारी ओळखून चळवळीचे स्वरुप धारण केले आहे.

ग्रामीण साहित्याला फुले, भालेकर, धनुर्धारी, ना. वि. कुलकर्णी, वि.स. सुखटणकर, दिघे, ठोकळ, वि.द. चिंदरकर, श्री. म.माटे, साने गुरुजी, म. भा. भोसले, ना. के. महाजन, व्यंकटेश माडगुळकर, अण्णाभाऊ साठे, शंकर पाटील, उध्दव शेळके, बहिणाबाई चौधरी, श्री. ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, आनंद यादव, सखा कलाल, रा.रं. बोराडे, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे अशी समृध्द परंपरा आहे. आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याचे स्वरुप आणि प्रयोजन स्पष्ट करणारे टीकाग्रंथ लिहून एकूणच मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. या वास्तववादी प्रवाहाने 1975 नंतर 'आधुनिक ग्रामीण साहित्य' हे नामाभिधान धारण केले. बदलत्या काळात ग्रामजीवन ही झपाट्याने बदलत आहे. नव्या लेखकांसमोर ग्रामीण जीवनाचे विविधांगी पदर धुंडाळण्याचे आव्हान उभे आहे. हे आव्हान नवी पिढी पेलते आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. आनंद पाटील, बाबा भांड, बाबाराव मुसळे, पुरुषोत्तम बोरकर, वसंत केशव पाटील, श्रीराम गुंदेकर, गणेश आवटे, रामचंद्र पाठारे, रंगनाथ पठारे, वासुदेव मुलाटे, राजन गवस, उत्तम बंडू तुपे, विश्वास पाटील इ. लेखकाचा नामोल्लेख पुरेसा ठरावा. माधव कोंडविलकर, अशोक व्हटकर आणि इतर अनेक दलित लेखकांच्या कथा - कादंब-यातून प्राध्यान्याने ग्रामीण भागातील दलित जीवन चित्रित होत आहे.

येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, आजचा ग्रामीण लेखक केवळ 'लेखक' नाही. त्याच्यावर 'आधुनिक' काळाने काही जबाबदारी सोपविली आहे. फुले, आंबेडकर, शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि. रा. शिंदे ही 'नागरी' परंपरा पचवून तो उभा राहिला पाहिजे अन्यथा लोकप्रिय लेखनाच्या लाटेत सापडल्यास तो त्याच गर्तेत गरगरत राहील, आपल्या भोवतालच्या ग्रामीण वास्तवाचे यथास्थित अवलोकन आणि आकलन त्याने केले पाहिजे. आजही मराठी वाङ:मयीन संस्कृतीवर वर्ण-वर्चस्ववादी मूल्यांचा आणि तथाकथित 'कलावादी' अभिरुचीचा काही प्रमाणात प्रभाव आहे. आजच्या ग्रामीण लेखकाने या सावटाखाली सापडण्याचा धोका टाळला पाहिजे. तसेच ग्रामीण साहित्यातील परंपराही तपासून घेतल्या पाहिजेत.

उदा. परंपरापूजक दृष्टीकोनातून 'गांरबीचा बापू' 'पडघवली' सारख्या कादंब-या लिहिल्या जातात. म्हणून या वाङ:मयादर्शा ऐवजी त्याने फुले, माटे, शेळके, बोराडे, यादव, नलगे, मोरे ही परंपरा अनुसरली पाहिजे.

अशा या ग्रामीण साहित्याची परंपरा ही मोठी आणि समृध्द आहे. त्यामानाने ग्रामीण काव्यलेखनाची परंपरा क्षीण दिसते. परंतु संशोधनाअंती हा आपला गैरसमज आहे असे दिसून येते. कदाचित एकूणच मराठी कवितेचा वाचक वर्ग कमी झालेला असल्याने हे विपर्यस्त चित्र निर्माण झाले असावे. मराठी ग्रामीण कविता आता केवळ 'जानपद' राहिलेली नाही. स्वांतत्र्योत्तर काळात आनंद यादव यांच्या 'हिरवे जग' पासून जाणीवपूर्वक ग्रामीण कविता लिहिली जावू लागली. ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ, प्रतिभा इंगोले, शंकर वाडेवाले, वसंत केशव पाटील, सोपान हाळमकर, फ. म. शहाजिंदे, इंद्रजित भालेराव, महेश केळूसकर, सदानंद देशमुख, महेंद्र पाटील, विठ्ठल किनगांवकर, उत्तम कोळगावकर, आबा गणपती या कवींनी ग्रामीण वास्तव शब्दरुप केले आहे आणि अजूनही त्याचे काव्यलेखन सातत्याने सुरु आहे. ग्रामीण लेखकाला आलेल्या आत्मभानाचे हे स्पष्ट प्रतीक आहे. ग्रामीण नाटकांची परंपरा लोक नाटयाच्या अंगाने बहरणे इष्ट आणि स्वाभाविक आहे. अण्णा भाऊंचे वग ही ग्रामीण नाटकेच होती. त्यानंतर रा. रं. बोराडे यांच्या नाटयलेखनाचा उल्लेख आवश्यक करता येईल.

अशा या ग्रामीण साहित्याच्या स्वरुपावरुन ग्रामीण साहित्याचा अर्थ पुढील प्रमाणे देता येतो.

## ग्रामीण साहित्य म्हणजे काय ?

प्रथम ग्रामीण साहित्याच्या वेगवेगळया साहित्यिकांनी लिहिलेल्या व्याख्या पाहू.

1. आनंद यादव :-

' ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय ? ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले ? की ग्रामीणांकरिता लिहीलेले ? की हे सर्वच ' (3).

पुढे जाऊन ग्रामीण साहित्याविषयी ते सांगतात--

'ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण मनाचा, समाजाचा अनेक ताणतणाव्यासह शब्दरुप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो, तो त्या प्रदेशाचा चालता-बोलता इतिहास असतो.' (4).

2) नागनाथ कोत्तापल्ले :-

'ग्रामीण साहित्यातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून निर्माण होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य होय'.(5)

ते पुढे म्हणतात -

' माणसाचे, माणसाच्या मनोविश्वाचे व्यवहारांचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य, ' (6).

ग्रामीण जीवनातील सुख दु:खे, चढ उतार, स्थितीगती यांचा अविष्कार करणा-या साहित्याला ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. (7).

डॉ. आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याची, 'खेडेगांव, तेथील जीवनपध्दती, तेथील अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी पण प्रदेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न व समस्या इत्यादी गोष्टीनुसार अनुभूतीतून जन्माला येते.'(8). अशी व्याख्या केलेली आहे. यावरुन ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवन प्रामुख्याने येते.'

ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य असे थोडक्यात म्हणता येईल. आजही आपल्या देशातील ऐंशी टक्के जनता खेडयापाडयामधून राहते. तेव्हा या ग्रामीण भागातून सर्वदूर पसरलेल्या समाजाची स्वत:ची अशी एक संस्कृती निर्माण झालेली आहे असे दिसेल. पुरातन काळापासून आपल्या देशामध्ये ग्राम आणि नगरे हा भेद आहे. नगर किंवा पूर हे त्या त्या काळाच्या दृष्टीने तथाकथित अर्थाने सुसंस्कृत, समृध्द, वेगवेगळया उदयोगांनी गजबजलेले आणि विविध व्यवहारांनी जटिल बनलेले ते नगर प्राचीन कालीन नगरांचे स्वरुप स्पष्ट करणारी 'भारतीय संस्कृती कोशा'तील नोंद या दृष्टीने महत्वाची ठरते. देवालये, प्रासाद. भिन्न . भिन्न प्रकारची निवासस्थाने, सभागृहे, पाठशाळा, प्रशस्त रस्ते, रमणीय उदयाने इत्यादींनी युक्त अशा वसाहतीस नगर असे म्हणतात.' असे सांगून विष्णू पुराणातील नगराची व्याख्या या संस्कृती - कोशात दिली आहे. ती अशी.

' व्यापार उदिमात निपुण अशा चारही वर्णाच्या लोकांनी युक्त, अनेक जातींच्या लोकांनी युक्त ..... असे स्थान त्याला नगर म्हणावे'.(9).

या नोंदीमधून काही बाबी स्पष्ट होतात. त्या म्हणजे समृध्दी, व्यापार आणि प्रशस्तता ही शहराची वैशिष्टे सांगितली गेली आहेत.

आजच्या शहरांचे स्वरुपही जगड्व्याळ व्यवहारांनी भरलेले, वैताग, खोटेपणा यांनी भरलेले जसे आहे, त्या प्रमाणेच ही शहरे समृध्दीची केंद्रे बनली आहेत. आज खेडी आणि शहरे यातील अंतर प्रचंड वाढलेले दिसते. तसे ते पूर्वीपासून वाढलेले आहे असेच म्हणावे लागेल.

खेडयाची रचना आणि संस्कृती ही शहराच्या रचना आणि संस्कृतीपेक्षा मूलतः भिन्न असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या मानवी स्वभावामध्ये फरक पडत गेलेला असणे हे ही स्वाभाविक आहे.

भारतीय खेडयाची रचना, समाजव्यवस्था बघितली,तर पुष्कळ बाबी स्पष्ट होत जातील. एक तर या समाजव्यवस्थेची स्वतःची अशी एक स्वतंत्र आणि स्वंयपूर्ण रचना आहे. युगानुयुगापासून चालत आलेल्या या रचनेत माणसे विशिष्ट अशा एका पध्दतीने बांधली जातात. त्या रचनेबाहेर बहुधा ती जात नाहीत.

जशी नगराची रचना एका विशिष्ट अशा पध्दतीने होत होती. त्याप्रमाणेच खेडयाची रचनाही एका विशिष्ट अशा पध्दतीनेच होते. गावातील रस्ते कसे असावेत, घरे कशी असावीत, पाटलाचे घर कुठे असावे, मंदिरे कुठे असावीत इ. बाबतीतील गावाची रचना परंपरेने चालत आलेली आहे. अशा प्रकारच्या ग्रामरचनेचे आठ प्रकार होते हेही श्री. शुक्ल यांनी सांगितले आहे.

बाहयरचना ही जशी परंपरेने चालत आलेली होती, त्याचप्रमाणेच या ग्रामसंस्कृतीची एक अंतर रचनाही होती ग्रामसंस्कृतीतील माणूस या ग्रामसंस्कृतीशी पक्का बांधला जाई. तो या अंतर्रचनेमुळेच, अशी ही ग्रामसंस्कृती स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण होती. एवढेच नव्हे तर, परंपरेने प्रत्येक खेडे म्हणजे एक स्वतंत्र राज्यच होते असे प्रा. सेन यांनी म्हटल्याचे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी गौरवाने उद्धृत केले आहे.

प्रा. सेन म्हणतात ---

These communities contain miniature all the materials of a state within themselves and are allmost sufficient to protect their members if all over governments where withdrown.'(10)

'Administrative system of Marathas'.

प्रथम 'गावगाडा' या त्रि. ना. अत्रे यांच्या पुस्तकाचे स्वरुप पाहू. हे पुस्तक त्यानी 1915 साली लिहले आहे. त्यात ग्रामीण संस्कृती व ग्रामीण रचना यांचाच विचार केला आहे.

त्रि. ना. अत्रे यांनी शेती आणि शेतकरी यालाच केंद्रस्थानी ठेवून हे पुस्तक लिहले आहे.

'गावगाडा' हे पुस्तक वाचले की प्रथम डोळयासमोर गाव उभे राहते. पूर्वी खेडे कसे होते, खेडयाची रचना कशी होती, तेथील जमीनी कशा होत्या, गावातील मुकादम कसा होता, गावात सुधारणा कोणती करावी लागेल तर ते खेडे सुधारेल अशा खेडयाचे सुंदर व सूक्ष्म चित्रण त्यांनी केले आहे.

'गावगाडा' यात त्रि. ना. अत्रे म्हणतात ---

' खेडे म्हटले की पांढरीच्या अगोदर चटकन काळीच उभी राहते. शेते, पीके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळया, मेंढया, मेंढके, शेतकरी, गुराखे, पाट, भुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, माळा, गोफण इत्यादी.

'चौगुला, महार, सुतार, लोहार, कुंभार, चांभार, जोशी, परीट, न्हावी, कोळी, गुरव इत्यादी कारु किंवा यांना बलुतेदार म्हणतात.

तेली, तांबोळी, धनगर, साळी, माळी, गोंधळी, भाट, ठाकर, डौ-या, गोसावी, जंगम, वाजंत्री, घडसी, कलावंत, तराळ भोई इत्यादी नारु किंवा यांना आलुतेदार म्हणतात.'(11).

ग्रामीण संस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषिकेंद्रित संस्कृती होती. आज खेडयापाडयातून परिवर्तनाला प्रारंभ झाला आहे. ही गोष्ट खरी आहे. परंतु कितीही परिवर्तने झाली तरी, 'कृषिकेंद्रित रचना' हे ग्रामसंस्कृतीचे प्रमुख वैशिष्टय राहील यात शंका नाही. म्हणून कृषिजीवन आणि शेतकरी हा ग्रामसंस्कृतीचा प्रमुख घटक पूर्वीपासूनच राहिलेला आहे. हा संपूर्ण 'गावगाडा' शेतक-याला केंदस्थानी ठेवून निर्माण झाला आहे, असेच दिसेल.

'गावगाडयाचे स्वरुप समजून घेत असताना या गावगाडयामागे शेती हाच कसा प्रमुख घटक आहे हे पाहिले. भारतीय शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. आजही पाऊस पडला नाही की, सबंध ग्रामजीवन कोमेजून जाते. पाऊस पडला की ते फुलून येते. आणि निसर्ग हा तर

लहरी आहे. वर्षानुवर्षे एखाद्या प्रदेशात पाऊस पडतच नाही. जमिनी ओसाड राहतात. लोक उपाशी मरायला लागतात .

निसर्गाच्या या लहरीपणामुळेच शेतकरी आणि कृषि संस्कृतीशी निगडित असणारी माणूस दैववादी बनण्याची शक्यता आहे. एकीकडे त्याचे गावगाडयात बांधले जाणे आणि दुसरीकडे निसर्गावर अवलंबून राहाणे यातून त्याचे मन स्वाभाविकपणेच आदिमातेकडे झुकत गेले तर आश्चर्य नाही. ही आदिमाता नागरी माणसाला नीटशी कळत नाही. म्हणूनच की काय, रुढ मराठी समीक्षा 'ग्रामीण माणूस म्हणजे अज्ञानी, रुढी - परंपरा जपणारा असतो'.(12).

ग्रामीण संस्कृतीसंबधी विचार करीत असताना आणखी एक दोन घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. हे घटक म्हणजे कुटुंबव्यवस्था आणि जातिरचना. या कृषिकेंद्रित संस्कृतीचे एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे एकत्र कुटुंबपध्दती याचेही प्रमुख कारण म्हणजे शेतीला माणूस बळाची आवश्यकता असते. माणूस बळासाठी मोठे कुटुंब हवेच. अशा मोठया कुटुंबात स्त्रीला महत्व प्राप्त होणे, हेही स्वाभाविक असते. किंबहुना, ग्रामीण समाजरचनाच अशी असते की, ज्यात माणूस नात्यागोत्याशिवाय राहूच शकत नाही. लग्न करताना सासूरवाडीत माणसे असावीत, मुलीला मोठा गोतावळा असावा हे पाहिले जात असे. याचा अर्थच असा की, शेतीला माणूसबळाची आवश्यकता असते. एखाद्या अडल्यापडल्यावेळी पाहूणे येऊन नांगरुन, वखरुन देतील. ग्रामीण जीवनातील दारिद्रयात हा गोतावळाच बरोबर असतो. अर्थात हा गोतावळा मदत करीलच असे नाही, पण अपेक्षा मात्र असते.

अर्थात प्रत्येक कुटुंब आपल्या स्वत:च्या अशा परंपरा, रुढी, रीतीरिवाज सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न करते.

परंतु आज ग्रामीण भागातूनही एकत्र कुटुंबपध्दती मोडताना दिसते आहे. वाढते शहरीकरण, वाढते उद्योगीकरण आणि इतर काही कारणांमुळे खेडयांतून काही प्रमाणात विभक्त कुटुंबे आकाराला येऊ लागली आहेत.

आज ग्रामीण भागात पुष्कळसे परिवर्तन घडत असले तरी, जातिव्यवस्था नष्ट झालेली नाही. ग्रामीण भागातील माणूस शिकू लागलेला आहे. शाळा, महाविद्यालये त्याच्या निकट आलेली

आहेत. पारंपारिक व्यवसायात बदलही होऊ लागलेले आहेत. वाढती प्रसारमाध्यमे त्याच्या गावात येऊन थडकलेली आहेत. हे सगळे असले तरी, या सर्व गोष्टींचा जातिरचनेवर किती परिणाम झाला आहे याची शंकाच आहे!

प्रत्येक जातीची स्वतःची अशी एक स्वतंत्र रचना असे. किंबहुना तिची तिच्या स्वतःपुरती एक वेगळी संस्कृतीच असे. स्वतःचे विधी असत. उदा. मूल जन्मल्यानंतरचे विधी, मर्तिकाचे विधी इत्यादी.

या सर्वच बाबींमध्ये आज शिथिलता आलेली असली तरी, जातिव्यवस्था मोडून पडलेली आहे असे मात्र दिसत नाही. या जातिव्यवस्थेतून ग्रामीण दलित फुटून बाहेर पडलेला आहे. परंतु इतर समाज अजून ते धाडस करताना दिसत नाही. तो आपापल्या जातिपरंपराना चिकटून आहे. 'जातीसाठी माती खाण्याचा प्रकार आजही आपणास दिसतो.'(13).

आजही खेडयापाडयांमधून प्रत्येक जात आपले म्हणून असलेले सांस्कृतिक संचित, रुढी, परंपरा यांचे ओझे घेऊनच जगत असते हे सगळे घेऊनच ती जात गावगाडयात समाविष्ट झालेली असते.

म्हणजे प्रत्येक जातीची स्वतःची अशी वर्तुळे एकमेकांना स्पर्शत, परंतु एकमेकांना छेद न देता स्वतंत्र, स्वयंपूर्ण गावगाडा तयार होत असे. आज यात पुष्कळसा कलह निर्माण होत असला तरी मुलभूत रचना बदललेली आहे असे मात्र म्हणता येत नाही. पूर्वी या व्यवस्थेचा आर्थिक आधार Barter system हा होता. आज 'बार्टर सिस्टिम' नसली तरी, सांगाडा मात्र अजून बदलू पाहात नाही .

म्हणजे ग्रामीण व्यक्ती ही कुटुंबाला बांधलेली, कुटुंब जातीला जात गावगाडयाला बांधलेली .... असा हा क्रम असतो. म्हणजे ग्रामीण व्यक्तीवर तीन घटक दबाव टाकत असतात. एक कुटुंबाच्या परंपरा, दोन जातीच्या परंपरा आणि तिसरे म्हणजे गावगाडयाची बांधणी या सगळयांमधून त्याची मनोरचना संपूर्णः वेगळी अशी होते.

पुन्हा हे सगळेच कृषिसंस्कृतीतून आलेले म्हणजे निसर्गसन्मुख, त्यामुळे ग्रामीण माणूस आदिम मनोवस्था बाळगून असतो हे ही दिसते. या सगळया घटकांमधून 'ग्रामसंस्कृती' निर्माण होत जाते. या संस्कृतीचे आणखी विविध घटक दाखविता येतील .

उदा. जत्राखेत्रों, लोकप्रकटन संस्था इ.

ग्रामीण साहित्यातूनच ग्रामीण वास्तव प्रकट होते. हे सगळे होत असताना माणसाचे 'माणूसपण' प्रकट होतेच. माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म प्रकट होतातच. म्हणजे ग्रामीण साहित्य दोन स्तरावर प्रचीती देते.

एक स्तर :- शेती, निसर्ग, त्यातून निर्माण झालेले समाजरचनेचे वेगळेपण, वेगळी जीवनपध्दती या सगळयांमधून घडत गेलेले तेथील 'लोकमानस' म्हणजे मनोरचना.

दुसरा स्तर :- माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म(14). हे उपरोक्त दोन्ही स्तर एकमेकांवरती परिणाम करीत असतात, हे उघड आहे. म्हणूनच एकूणच ग्रामीण साहित्याचे आकलन करावयाचे झाल्यास, पहिल्या स्तराचे स्वरुप नीट समजावून घेणे आवश्यक असते.
किंबहुना ते समजावून घेतले नाही तर, ग्रामीण साहित्य कळणारच नाही.

आजपर्यंतच्या ग्रामीण साहित्यातून जाणवणारे आणखी एक वैशिष्टय म्हणजे, हे साहित्य व्यक्ती हा घटक केंद्रस्थानी ठेवीत असते. व्यक्ती हा घटक केंद्रस्थानी ठेवूनच वरील दोन्ही स्तरांचा प्रत्यय देण्याचा प्रयत्न लेखक करीत असतात.

उदा. 'गोतावळा', 'पांचोळा', 'धग' आणि 'टारफुला' या निवडक चार कादंब-याचा विचार केला तरी हेच दिसेल. एक किंवा दोन व्यक्तींना केंद्रस्थानी ठेवूनच हे कादंबरी लेखन झालेले दिसेल. या व्यक्ती ग्रामीण जीवनातील असल्यामुळे, किंबहुना ग्रामसंस्कृतीतल्या असल्यामुळे, त्यांच्यात मुरलेले ग्रामीणत्व प्रकट होत जाते. ग्रामीण कथांचा विचार करतानाही आपणास असेच दिसते. अगदी 'काळ तर मोठा कठीण आला'. या कथेपासून ते आजच्या भास्कर चंदन शिवांच्या कथेपर्यंतच्या कथा बघितल्यास, त्या सर्वच एखाद्या व्यक्तिमत्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेल्या आहेत असे दिसते. त्यामुळे या कथा शब्दचित्रे किंवा व्यक्तिचित्रे झालेली आहेत असे मात्र नाही. कथेची चौकट सांभाळून त्या व्यक्तिकेंद्री झालेल्या आहेत.

थोडक्यात असे सांगता येईल की, 'ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रित तर असतेच, पण त्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीस कृषिकेंद्रित संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस, या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा इत्यादी घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्वाला

केंद्रस्थानी ठेवून लिहीत असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनित होत जातात. आणि त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते.' (15).

ग्रामीणत्वाचे स्वरुप नीट समजावून घेतल्याशिवाय ग्रामीण साहित्याचे पुरेसे आकलन होत नाही आणि 'ग्रामीणत्वा' चे स्वरुप समजून घ्यायचे असेल तर ग्रामीण जीवनाची रचना समजून घेणे जरुर आहे.

'गावगाडा' 'आमचा गाव बदलापूर' 'गावरहाटी' आणि 'गावगाडयाबाहेर' हे ते चार ग्रंथ होत. याशिवाय आणखी काही ग्रंथांचा निर्देश करणे अशक्यच आहे असे नाही. परंतु हे चार ग्रंथ अधिक तोलामोलाची आहेत. किंबहुना या चार ग्रंथांचा नीट विचार केल्याशिवाय ग्रामसंस्कृतीचे अंतरंग हाती लागणार नाही.

ग्रामसंस्कृतीचा आणि ग्रामरचनेचा वेध घेणारे मराठीतील पहिलेवहिले पुस्तक म्हणून ज्याचा निर्देश करावा लागतो, ते म्हणजे त्रि. ना. अत्रे यांचे 'गावगाडा' हे होय. 1915 साली हे पुस्तक प्रसिध्द झाले. आज ऐंशी वर्षे होत आली तरी या प्रकारचे दुसरे पुस्तक अजून तरी मराठीत उपलब्ध नाही.

प्राचीन काळापासून खेडे कसे आकाराला येत गेले हे तर त्यांनी सांगितले आहेच, पण आजची खेडयाची रचना कोणत्या प्रकारची आहे हेही त्यांनी अतिशय तपशीलाने सांगितले आहे. 'गावगाडा' म्हणजे गावावर रचलेले एक सांग रुपकच. युगानुयुगांपासून चालत आलेल्या या गाडयाचे स्वरुप कसे आहे, या गाडयात कोण कोण आहेत, तो कसा चालला आहे आणि आता बदलत्या काळानुसार नीट चालायचा तर, कोणती सुधारणा करावी लागेल इ. बाबींचे तपशीलवार विवरण अत्रे करीत जातात. हे करताना खेडोपाडी हिंडून जमविलेली माहिती, घेतलेल्या मुलाखती आणि तिथली रचना त्यांनी फार नीटस रीतीने उलगडून दाखवली आहे. इथे केवळ खेडयाचे शब्दचित्र ते रेखाटत नाहीत, तर तिथले आर्थिक आणि सामाजिक संबंध कोणते याचा ते शोध घेतात. किंबहुना या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीवर जी टीप आहे तीच मुळी सामाजिक संबंधाचा निर्देश करणारी अशी आहे.

'Notes on Rural Socialogy and village problems with special reference to Agriculture'.

असे उपशीर्षक या पुस्तकाला दिले गेले आहे. यावरुन या पुस्तकाचे स्वरुप लक्षात येते. (16).

समाजशास्त्रीय स्वरुपाचा जरी हा ग्रंथ असला तरी, मराठीतील गद्याचा अविष्कार म्हणूनही या ग्रंथाचा निर्देश करावा लागेल. साधे, सोपे, स्पष्ट आणि परखड, प्रभावी आणि प्रत्ययकारी असे गद्य म्हणून 'गावगाडा' या ग्रंथाकडे पाहता येईल. बुध्दिनिष्ठ दृष्टी आणि प्रत्यक्ष अनुभवाचा आधार यामुळे इथल्या गद्याला अधिकच सामर्थ्य प्राप्त होते. हा लेखक शेतक-यांच्या बाजूने झुकलेला आहे असे वाटत असले तरी, प्रत्यक्षात वास्तवाचे स्वरुप न्याहाळताना तो ग्रामविभागातील सर्व घटकांकडे सारख्याच दृष्टीने पाहतो ही ही लेखकाची जमेचीच बाजू आहे. आणि त्यामुळे इथल्या गद्य लेखनाला अधिकच धारदारपणा प्राप्त होतो. गावगाडयासंबंधी विचार करताना आज गावगाडयात कोणत्या सुधारणा झाल्या पाहिजेत हे सांगताना, त्यांची समाजाकडे पाहण्याची व्यापक आणि समंजस दृष्टी तर दिसतेच, पण त्यांच्या चिंतनाचा आवाकाही लक्षात येतो. तसेच म्हणी आणि वाक्प्रचारांचा समर्थ वापर हे ही त्रि. ना. अत्रे यांचे फार मोठे सामर्थ्य होय.

'गावगाडा' या ग्रंथप्रमाणेच श्री. ना. गो. चापेकरांचा 'आमचा गाव बदलापूर' हा ग्रंथ समजावून घेणेही आवश्यक ठरते. (17).

चापेकरांनी आपल्या गावची जी 'सामाजिक, आर्थिक, धार्मिक व ऐतिहासिक पाहणी' केली त्यातून हा ग्रंथ सिध्द झाला आहे. एखाद्या गावाची इतकी विस्तृत आणि सखोल पाहणी यापूर्वी आणि नंतरही मराठीत तरी झाली नाही. या दृष्टीने 'गावगाडा' जसा महत्वाचा आहे तसेच 'बदलापूर' ही महत्वाचे आहे.

1934 साली प्रसिध्द झालेल्या या ग्रंथाचा हेतू लेखकाने प्रस्तावनेत स्वच्छ सांगितला आहे. ब्राम्हण आणि कुणबी दोघेही दुर्दशेला जाऊ लागले आहेत. तर तिसरा श्रीमंत वर्ग कोणता उदयाला येतो आहे याची पाहणी करण्यासाठी आपण आपल्या गावची प्रथम आर्थिक पाहणी केली, मग इतर अंगाकडे वळलो असे ते सांगतात. ही पहाणी त्यांनी अंत्यत चिकित्सकपणे केली म्हणजेच ही पाहणी त्यांनी अतिशय कष्टपूर्वक अशी केली आहे. तसेच सुक्ष्मातिसूक्ष्म अशा पातळीवर जाण्याचा प्रयत्नही या ठिकाणी दिसतो. या आणि इतर अनेकविध दृष्टीनी हा ग्रंथ फारच मोलाचा आहे. यात

शंका नाही. ठिकठिकाणी आकडेवारीचे तक्ते दिल्याने ग्रंथाच्या उपयुक्ततेत आणि शास्त्रीयतेत भर पडली आहे.

'गावगाडा' या ग्रंथात त्रि. ना. अत्र्यांनी गावाची रचना कशी असते व त्या मागील तत्वे कोणती असू शकतात, याबाबत विवेचन केलेले आहे, तर त्या रचना सुत्रानुसार एखादा गाव प्रत्यक्षच कसा असू शकतो, याचा विचार आणि पाहणी 'बदलापूर' मध्ये दिसते.

ना. गो. चापेकर यांनाही आधी शेतकरी आणि नंतर इतर लोक हे सूत्र मान्य आहे, नव्हे ते त्यांनी मांडले आहे. ते म्हणतात, 'शेतीच्या भोवती लोक जमतात. हयामुळे प्रत्यक्ष शेती करणाना-यांना प्राधान्य प्राप्त होते. आमच्या गावात सर्व जातीचे मिळून मराठे, आग्री, कोळी आणि भोई हे मुख्यत: जमीन कसणारे लोक होत ...... जमीन पिकविण्याकरता जमीनीवर प्रथम शेतकरी येतो. नंतर शेतीच्या व्यवसायाला साधनीभूत लोक त्याच्या भोवती गोळा होतात. हयांना कारु म्हणतात...... म्हणजे एका शेतक-यांचा मागोमाग पाऊण कारु आला असे होते.(18).

याचा अर्थच असा की, बदलापूरचा विचार करताना कृषिकेंद्रितता ना.गो. चापेकरांना महत्वाची वाटते. कारण त्यांच्या पाहणी प्रमाणे तेथील अर्धे लोक शेतीवर या ना त्या प्रकारे जगणारे आहेत.

'बदलापूर' बद्दल भौगोलिक, ऐतिहासिक आणि प्रत्यक्ष पाहणीतील माहिती देऊन लेखक जेव्हा प्रत्येक जातीची पाहणी सादर करु लागतो तेव्हा तर, आपण थक्कच होऊन जातो. गावात स्थायिक असलेल्या चौतीस जातींची ऐतिहासिक, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक आणि इतरही माहिती आकडेवारीसह लेखक देत जातो. एवढेच नव्हे तर, गावातील रोगराई, त्यावरील औषधे झाडे, गुरे, जंगल, बाजार, शिक्षण, ग्रामदेवता, जन्ममृत्यू, व्यसने, सर्प इत्यादीबद्दल तो इतक्या तपशिलाने माहिती देतो की बदलापूर सर्वार्थाने डोळयापुढे तर उभे राहतेच, पण पाचशे पृष्ठांवर पसरलेल्या मजकुरासाठी नकाशे, आकडेवारी, यांच्यासाठी एका पेन्शनर गृहस्थाने एवढी मेहनत घेतली आहे. यावर आपला विश्वासच बसत नाही, एवढे थक्क करुन सोडणारे हे कार्य आहे.

वर निर्देश केल्याप्रमाणे येथे अनेक जातींचा फार सविस्तर अभ्यास केला आहे. त्या बरोबरच प्रत्येक जातीतील कुटुंब व्यवस्था उलगडून पाहण्याचाही येथे प्रयत्न केला आहे. म्हणजे

कुटुंब व्यवस्था आणि मग त्या त्या जातीची समाजव्यवस्था अशी इथली अभ्यासाची पध्दती आहे. तसेच प्रत्येक जात आपल्या अस्तित्वासंबंधी काही कथा सांगत असते. अशा अनेक-विध कथा येथे येतात. उदा. आगऱ्यांना बिंबराजाने मिठागरे करुन दिली, कुंभार शंकराशी खोटे बोलेले म्हणून त्यांना कायम दारिद्रय असते, यासारख्या जातीसंबंधी जशा कथा येथे येतात, त्याप्रमाणेच इतरही काही कथा येतात, जशा कातक-यांच्या संदर्भात आलेल्या कथा या सर्व कथा हया लोककथातर आहेतच, पण त्यातून त्या त्या समाजाच्या आदिम अवस्थेशी संवादी असलेल्या मनाच्या निदर्शक आहेत. 'ग्रामीणत्वा' संबंधी विचार करताना 'समाजमनाचे आदिमत्व' हा घटक महत्वाचा असल्याचा निर्देश यापूर्वी येऊन गेलाच आहे.

त्या त्या जातीसंबंधी निष्कर्ष सादर करताना, चाफेकर अतिशय तटस्थपणे सर्व जातींची माहिती नोंदविताना दिसतात. तसेच, सर्व जातीसंबंधी सारखीच प्रश्नावली वापरल्याने आपाततःच त्यांच्यामधील फरकही लक्षात येत जातो.

प्रत्येक जातीच्या उपजीविकेच्या धंदयासंबंधी विवरण करुन, लेखक त्यांचे उत्पन्न आणि खर्च याचाही हिशेब सादर करतो. त्यानंतर त्या त्या जातीमध्ये काही पोटजाती असतील तर त्याची वेगळीकही सांगतो. हा सगळा बाहय तपशील झाल्यानंतर, तो त्या त्या जातीच्या रीतीरिवाजांकडे वळतो. या रीतीरिवाजांचेही तो फार बारकाईने निरीक्षण करताना आणि नोंद घेताना दिसतो, गर्भाधान समारंभ, बाळंतपण, पाचवीचे विधी, लग्नाचे विधी आणि शेवटी अंत्यविधी हे सगळे विधी लेखक नोंदवीत जातो, त्या त्या विधीमधले वैचित्र्य, तो कसलेही भाष्य न करता नोंदवितो, या विधीमध्ये म्हटली जाणारी गाणी प्रत्येक जातीत वेगळी आहेत. ती सगळी गाणी मिळविण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. तसेच काही ठिकाणी औषधोपचार कोणते केले जातात हे जसे त्याने नोंदविले आहे, त्याप्रमाणेच काही जातीमध्ये रुढ असणारे मंत्रही त्यांनी मिळवून छापले आहेत.

उदा. गुरवांमधील एकाला जे मंत्र येत होते ते त्यांनी दिले आहेत. सर्पाचा मंत्र, पिशाच्च बाधेवर मंत्र, विंचवावर मंत्र, दृष्टीवर मंत्र असे काही मंत्र येथे जसे येतात, त्याप्रमाणेच ठाकरांचे मंत्र, तोडगे आणि औषधोपचार यांचीही येथे विस्तृत नोंद घेतली आहे. म्हणजे लोकगीते, लोककथा, लोकवैदयक आणि मंत्रतंत्र इत्यादी कितीतरी बाबी हा लेखक नोंदवीत जातो की, ज्यामधून त्या त्या समाजाचे आदिमतेकडे झुकणारे मनोदर्शनच होते.

' कृषिकेंद्रितता आणि आदिमतेकडे झुकणारी ग्रामीण मनोवस्था या दृष्टीने हा ग्रंथ महत्वाचा संदर्भ ग्रंथ तर आहेच, पण एखाद्या गावाचा विचार किती अंगानी आणि किती सखोल होऊ शकतो याचा हा ग्रंथ एक आदर्शच होय यात शंका नाही.' (19).

'गावरहाटी' या पुस्तकाला एका वेगळयाच संदर्भात महत्व प्राप्त होते. या ग्रंथातून वि.म. दांडेकर आणि, म. भा. जगताप या लेखक द्वयांनी गाव कसा चालतो, कोणत्या क्रमाने चालतो, याचे अतिशय सूक्ष्म प्रकटन केले आहे. ही 'रहाटी' आहे तरी कशी, याचा शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

'गावगाडा' या पुस्तकात गावाच्या रचनेमागीलसूत्र आणि रचना यांचा विचार येतो, तर 'बदलापूर' मध्ये प्रत्यक्ष गावाची रचना उलगडून पाहण्याचा प्रयत्न दिसतो. ही दोन्ही पुस्तके झाली खेडयाच्या रचनेबद्दल.

एका विशिष्ट पध्दतीने खेडे रचले जाते हे एकदा लक्षात आले की, त्या खेडयाचा कालक्रम कसा व्यतीत होतो हा ही एक महत्वाचा प्रश्न उपस्थितच, हा कालक्रम त्या रचनेशी, त्या रचनेमागील सूत्राशी संवादी असाच असला पाहिजे हे उघड आहे असा कालक्रम आणि एकूणच 'गावाची रहाटी' शोधण्याचा प्रयत्न येथे केला गेला आहे.

अर्थात लेखकव्दय ही रहाटी शोधतात तो कालखंड आहे. स्वातंत्र्यानंतर एक तप उलटून गेल्यानंतरचा 1960 - 61 साली महाराष्ट्रातील खेडयाची रहाटी आहे तरी कशी याचा शोध येथे जगताप - दांडेकर घेताना दिसतात, त्याबरोबर ग्रामीण भागातील सामाजिक आणि राजकीय व्यवहार कसे घडतात इकडेही लेखक द्वयांनी लक्ष दिले आहे. तसेच एखाद्या विशिष्ट खेडयाची रहाटी पाहत असताना - काळ बदललेला असला तरी, त्यावर पारंपारिक 'गावगाडया' चा किती मोठा प्रभाव आहे हे ही लक्षात येते म्हणूनच अनेक अर्थानी उपरोक्त दोन्ही पुस्तकांप्रमाणे 'गावरहाटी' हे पुस्तकही महत्वाचे आहे.

आजच्या खेडयाचा कालक्रम - रहाटी कशी कृषिकेंद्रित आणि निसर्गसन्मुख आहे हे या ग्रंथात अतिशय तपशिलाने आले आहे. तसेच आजच्या सामाजिक आणि राजकीय व्यवहाराचे चित्रणही येथे आले आहे.

ग्रामीण साहित्याभ्यासाच्या दृष्टीने लक्षणीय असणारा हा ग्रंथ लिहिला आहे सुप्रसिध्द अर्थ शास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर आणि म. भा. जगताप यांनी. या लेखाकव्दयांच्या अर्थशास्त्रज्ञ असण्याचा निर्देश येथे मुद्दाम केला पाहिजे. कारण ते काही रुढार्थाने लेखक - ललित लेखक नव्हते. त्यांच्या शोध प्रकल्पासाठी त्यांनी जी टिपणे घेतली, महाराष्ट्रभर जी भटकंती केली त्यातून हा ग्रंथ सिध्द झाला आहे. त्यांच्या दृष्टीने हे पुस्तक म्हणजे एक 'बाय प्रॉडक्टच' आहे.

हेतू नसतानाही एखादा उत्तम ललित ग्रंथ निर्माण होऊ शकतो. याचेही हे उत्तम उदाहरण होय असे म्हणायला हरकत नाही. म्हणजे 'गावरहाटी' हा ग्रंथ खेडयाच्या रहाटीचे स्वरुप सांगणारा तर आहेच, पण ललित्यपूर्ण असाही झाला आहे.

स्वत:ची वैयक्तिक मते त्यात त्यांनी मिसळू दिली नसली तरी त्यांच्या रसिक आणि सौंदर्यदृष्टी असलेल्या व्यक्तिमत्वांचा स्पर्श या टिपणांना लाभला असल्यामुळे मुळातच नाटयक्षम असणारी टिपणे अतिशय ललित्यपूर्ण होत जातात. त्यामुळे एकाच वेळी ललितत्यपूर्ण ग्रंथ आणि 'रहाटी' चा शोध घेणारा ग्रंथ या दोंन्ही दृष्टींनी हा ग्रंथ महत्वाचा ठरतो.

' या तिंन्ही पुस्तकांमधून ग्रामरचना आणि ग्रामरहाटी लक्षात येते. या 'रचने' मधून आणि 'रहाटी' मधून जशी ग्रामसंस्कृती आकार घेत जाते, ग्रामीणत्व प्रकट होत जाते, तसेच 'गावगाडा' आणि 'गावगाडया बाहेरील घटक' यांच्या संबंधामधूनही ग्रामीणत्व आकार घेत जाते. किंबहुना 'फिरस्ते' हे ग्रामसंस्कृतीतील एक महत्वाचे घटक होत हेच लक्षात घ्यावे लागते.' (20).

जे गावगाडयात मिसळू शकले नाहीत अगर ज्यांना गावकुसातच काय, गावकुसाबाहेरही कुठले स्थान अगर व्यवसाय मिळू शकला नाही, असे असंख्य फिरस्ते दरवर्षी नियमितपणे किंवा अनियमितपणे गावाला भेटी देऊन त्यांच्या गरजा भागवताना दिसतात. अशा फिरस्त्यांची नोंद त्रि.ना. अत्रे यांनी केली आहे. त्याबरोबरच हे फिरस्ते कसे गुन्हेगार असतात हेही सांगितले आहे. अशा फिरस्त्यांपैकी काही फिरस्त्यांचा फार बारकांईने आणि सहानुभूतीने विचार केला आहे. तो डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या 'गावगाडयाबाहेर' या ग्रंथात. त्यांनी गुन्हेगार जाती, या गुन्हेगार का झाल्या याचा अतिशय सहानुभूतीने शोध घेतला आहे. गावगाडयात स्थान नसणे प्रतिष्ठित असा उपजिविकेचा व्यवसाय नसणे - अशी काही कारणे त्यांनी नोंदविली आहेत. तसेच गुन्हेगारी अनुवंशिकतेने एका पिढीकडून दुस-या पिढीकडे जाते हे ही त्यांनी खोडून काढले आहे. या

भटक्या जातीचा अभ्यास करताना लेखकाने सतत वर्तमानाचे भान बाळगले आहे. त्यामुळे काही भटक्या जातीमधून घडणा-या परिवर्तनाची नोंदही त्यांनी घेतली आहे.

श्री. लक्ष्मण माने यांचे 'उपरा' हे आत्मवृत्तही असेच लक्षणीय आहे. श्री. माने हे कैकाडी या भटक्या समाजातील शिकून पुढे आलेले कार्यकर्ते. 'उपरा' मध्ये त्यांनी आजच्या ग्रामीण परिसरातील ताण-तणावांचे चित्रण तर केले आहेच, पण त्याबरोबरच फिरस्ते आणि ग्रामजीवन यांच्यातील नातेसंबंधाचे प्रकटनही ते करीत जातात. फिरस्ते हे ग्रामजीवनातील कृषि संस्कृतीतील एक घटक होत, याची जाणीव हे आत्मवृत्त वाचताना होतेच, पण भटके अजूनही आदिम मनोवस्थेत कसे रुतून बसले आहेत, याचीही जाणीव येथे झाल्याशिवाय राहत नाही. किंबहुना, हीच या पुस्तकाच्या संदर्भातील अधिक महत्वाची बाब होय असेही म्हणता येईल. कारण कैकाडयांचे स्वतंत्र विधी, आचार-विचार आणि त्यातून निर्माण झालेले स्वतंत्र असे मनोविश्व यांचे प्रकटन लेखक फार नीरसपणे करतात. ही मनोवस्था म्हणजे आदिमतेशी नाते सांगणारी अशीच मनोवस्था होय असे म्हणता येईल, आणि ही आदिम मनोवस्था म्हणजे ग्रामीणत्वाची एक खूणच होय.

अर्थात फिरस्त्यांच्या जीवनाची दु:खद कहाणी परिणामकारकतेने प्रकट करण्यात श्री. लक्ष्मण माने यशस्वी झाले आहेत यात काही शंका नाही.

'उपरा' हे आत्मनिवेदन प्रामुख्याने ग्रामीण जीवनात वावरणा-या व्यक्तीचे आत्मनिवेदन असल्यामुळे, ग्रामीण जीवनाचे संदर्भ येथे येणे स्वाभाविक आहे. परंतु दया पवार, उत्तम बंडू तुपे आणि प्रा. रुस्तम अचलखांब हे लेखक प्रामुख्याने शहरात राहणारे, परंतु या लेखकांचे बालपण सगळे खेडयापाडयामधून गेले आहे. त्यामुळे त्याच्या आत्मनिवेदनामधून ग्रामीण जीवणाचे चित्रण येणे स्वाभाविक आहे तसे ते आलेलेही आहे. 'बलुतं' या आत्मनिवेदनाचा प्रांरभीचा भाग या दृष्टीने लक्षणीय आहे. 'काटयावरची पोर' या आत्मनिवेदनातील प्रांरभीचा भाग असाच खेडयापाडयातील जीवनाचे चित्रण करणारा आहे. ज्या वाखाच्या उदयोगाचे चित्रण या आत्मनिवेदनात येते तो उदयोगच मुळी ग्रामीण भागात चालू शकणारा, वाखाच्या उदयोगाबरोबरच ग्रामीण जीवनातील इतर अनेक घटकांचेही चित्रण येथे येते. रुढी, परंपरा आणि त्यात पिचून निघणारे दलित जीवन येथे प्रकट होत जाते.

नुकतेच प्रसिध्द झालेले प्रा. रुस्तम अचलखांब यांचे 'गावकी' हे आत्मनिवेदन अनेक

दृष्टीने लक्षणीय आहे. या आत्मनिवेदनाचे नावच मुळी अर्थपूर्ण आणि ग्रामीण संस्कृतीचे सूचन करणारे आहे. आपले बालपण, दलित जीवनातले दुःख आणि दारिद्र्य हा लेखक अतिशय तटस्थपणे प्रकट करीत जातो. त्या बरोबरच आजही ग्रामीण भागात फारसा बदल झालेला नाही. हे नोंदवायलाही विसरले नाहीत.

हे आत्मनिवेदन चटकन वेगळे पडते ते संपूर्णतः ग्रामीण बोलीतच केलेल्या निवेदनामुळे. या पूर्वी प्र. ई. सोनकांबळे यांनी अस्सल ग्रामीण बोलीचा वापर केला आहे, ते प्रा. रुस्तम अचलखांब त्यांच्याही पुढे जातात आणि संपूर्ण निवेदन ग्रामीण बोलीत करतात. ही फार महत्वाची बाब आहे. ग्रामीण भागात व्यतीत झालेले जीवन संपूर्णतः ग्रामीण बोलीत प्रकट होणे हे अतिशय स्वाभाविक आहे. या दृष्टीने हे आत्मनिवेदन नुसते वेगळेच आहे असे नाही, तर या बोली वापरण्याच्या प्रयोगामुळे अधिक समर्थ झाले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.'

ग्रामीण वाङःमयात 'लोककथा' हाही एक वाङःमय प्रकार आहे." 'लोककथा' या एका पिढीपासून दुस-या पिढीकडे, एका गावाकडून दुस-या गावाकडे संक्रमित होत असतात."(21).

अण्णाभाऊ साठे यांच्या पुष्कळशा कथा ग्राम जीवनाचे चित्रण करणा-या अशा आहेत.

उदा. कुत्र्याचा कान कापून माणसाचे कान कापल्याचा विधी साजरा करण्याचे चित्रण त्यांच्या एका कथेत येते. हा विधी ग्रामजीवनातीलच आहे, यात शंका नाही. या कथेचा उदाहरणादाखल नुसता निर्देश केला आहे. अशा पुष्कळ कथा निर्देशिता येतील.

श्री. म. माटे यांना ग्रामजीवनाचे अतिशय नेमके आणि परिपूर्ण असे आकलन झालेले होते. ग्रामीण जीवनातील दलिताच्या वेदनेचे चित्रण करणारे कथाकार म्हणून आपणास यांचा निर्देश करावा लागेल. 'एका अस्पृष्टाच्या डायरीतील पाने', 'सगाजीबुवा', 'नाथनाक आणि देवकाई यांची काळझोप', 'बन्सिधरा तू कोठे रे जाशील,' 'तारळखो-यातील पि-या' इत्यादी श्री. म. माटे यांच्या कथा म्हणजे ग्रामीण परिसरात राहणा-या दलितांच्या जीवनाचे चित्रण करणा-याच कथा आहेत.

श्री. साठे, माटे आणि खरात यांच्या कथामधून प्रकटणारे ग्रामीण जीवनाचे चित्रण म्हणजे ग्रामव्यवस्थेतील दलित जीवनाचेच चित्रण आहे, यात शंका नाही. ग्रामव्यवस्थेच्या

चौकटीची जाणीव असणा-या या चौकटीत तयार होऊ शकतील अशा मनोवृत्तीचे चित्रण येथे घडत गेले आहे. या कथांमधील दलित व्यक्तींना ग्राम जीवनातील दु:खाची जाणीव आहेच, त्यामुळेच या व्यक्ती त्याविरुध्द बंडही करुन उठतात. या व्यक्तींचे दु:ख आणि त्यांचे बंड लक्षात येण्यासाठी, ग्रामजीवनाचे चित्रण येथे येणे अपरिहार्य ठरते.

श्रीपाद महादेव माटे यांनी आपल्या 'उपेक्षितांचे अंतरंग' या पुस्तकात वाङ:मयीन साहित्य म्हणून लघुकथा मांडलेल्या आहेत. लघुकथा हा वाङ:मयाचा प्रकार आधुनिक विदयाभ्यासाच्या परिचयाचा आहे म्हणून नव्या लेखकात या वाङ:मयाची हौस झपाटयाने वाढलेली आहे. या वाङ:मय विशेषाने लेखकावरचा बोजा बराच कमी झाला आहे. ललित लेखन हे आठ आठशे पानांपर्यत जाऊन पोहोचले होते, परंतु कवींनी जशी लहान लहान सौंदर्य लहान लहान कवीतांच्या रुपाने व्यक्त करण्याची प्रथा पाडली. तशी ती लहान लहान गद्य परिच्छेदांनी व्यक्त करण्याची प्रथा या लघुकथांच्या उपक्रमामुळे पडत चालली. आता तर लघुतम कथाही कोणी कोणी लिहीत आहेत. ते ही सौंदर्यदर्शनाला अवश्यच आहे. हे झाल्यामुळे विचार, भावना व सौंदर्य यांच्या सुटसुटीत अविष्काराला उत्तमच साधन लेखकांच्या हाती आले आहे, आणि ज्यांच्या प्रतिभेची चमक व क्षणिक अल्पतेज पण सुंदर असते. त्यांना सुध्दा कोंडमारा होण्याची भीती या नव्या साधनामुळे राहीली नाही. छोटी छोटी कवने लिहिणारांना सुध्दा लाभू लागले आहे. येऊन जाऊन त्यांच्या सौदर्यविष्काराला गेयतेची जोड नसल्यामुळे जो काय थोडा कमीपणा राहत असेल तोच. असे सौंदर्य निर्माण करणारे चांगले चांगले लेखक आपल्या समाजात आहेत व तरुण लोकांतून तर नित्य नवे आकांक्षी लेखक पुढे येत आहेत.

लघुकथेत अनेक ठिकाणी घरगुतीपणा असल्यामुळे त्यांची भाषा नैबंधिक वाङ:मयापेक्षा निराळी असावी हे स्वाभाविक आहे. त्यातही ब्राम्हण, मराठे, कुणबी, महार, मांग, कातकरी, स्त्री पुरुष अशी अनेक प्रकारची माणसे आलेली असल्याने, वास्तवरुप प्रतीत व्हावे म्हणून नागर व ग्रामीण अशा दोनही भाषांचा संकर केलेला आहे. पांढरपेशे लोक सोडून इतरांची भाषा सगळीच्या सगळी त्यांच्या पध्दतीची लिहिता येणे शक्य होते. पण अनुभव असा आहे की, तसली भाषा वाचकांना अतिपरिचयामुळे वाचायला बराच त्रास होतो, न लिहावी तर वास्तवाचा घात होतो व वस्तूत स्वाभाविकपणा दिसत नाही म्हणून या कथेतून त्याच पात्राच्या तोंडी अवश्य तितकी ग्रामीण भाषा

घातली आहे व मग चालू नागर भाषा उपयोजिली आहे. या मिश्रणामुळे वास्तवाचे सौंदर्य व ग्रामीण भाषेचे राकट माधुर्य कायम राहून वाचकांची अडचण बरीच कमी होते. पुष्कळ ठिकाणी जुन्या भाषेचे प्रयोग आहेत असे कोणास वाटेल, पण देशावर राहिलेल्या व भाषेच्या दृष्टीने जीवनात रटाळलेल्या वाचकांना दिसून येईल की, हे प्रयोग जुन्या भाषेचे नसून चालू भाषेचेच आहेत. आपली भाषा भारीच संस्कृतमय व वर्तमानपत्री थाटाची झालेली आहे. त्यामुळे लोकभाषा जुनीशी वाटते, इतकेच.

अशा या ग्रामीण लोककथा, कादंब-या, कविता, लोकगीते यामधून ग्रामीण जीवन आणि निसर्ग यांचा घनिष्ट संबंध दाखवलेला आढळतो. अशा या ग्रामीण वाड:मयात महत्वाचा वाटा म्हणून त्रि. ना. अत्रे, प्रभाकर मांडे, दांडेकर, चाफेकर, म. फुले, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, शंकर पाटील, आनंद यादव, रा.र. बोराडे, चंद्रकुमार नलगे इत्यादी लेखाकांनी उचललेला आहे. त्यामध्ये चंद्रकुमार नलगे यांचे स्थान फार महत्वाचे आहे.

चंद्रकुमार नलगे हे ग्रामजीवनावर वैपुल्याने लिहिणारे लेखक आहेत. त्यांनी अगीनफूल, देवाची साक्ष, गस्त, शहाळी, कपिला या कादंब-या लिहिलेल्या आहेत. त्यापैकी अगीनफूल (संजय प्रकाशन, पुणे, 1974), गस्त - ओंकार प्रकाशन, पुणे, 1976 आणि देवाची साक्ष, ही कादंबरी श्री विशाखा प्रकाशन, पुणे, 1979 मध्ये प्रकाशित झाली. या त्यांच्या ग्रामीण कादंब-यातून प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाचे वास्तव स्वरुप चित्रीत केलेले आहे.

'देवाची साक्ष' या कांदबरीत धरणामुळे उठलेल्या वस्तीचे चित्रण आलेले आहे. जुन्या मातीचे बंध तुटताना होणारी घालमेल आणि नव्या मातीत रुजताना उद्ध्वस्त होणारी जुनी जीवनरहाटी यांची ती शोककथा आहे. नलग्यांच्या कादंबरीतील माणसे अगतिकपणे सहन करतात. त्याची सीमा झाल्यावर मात्र ती सर्वस्वानिशी झुंज घेतात. मनात आदर्शाची स्वप्न जागवित वास्तवात रक्तबंबाळ होत राहतात. नलग्यांना ग्रामजीवनाची प्रत्यक्षानुभूती आहे. त्यांच्या परंपरांचे, श्रध्दा - संकेताचे आणि विविधांगांचे भान आहे. पण या वास्तवाकडे ते सरळ, प्रत्यक्षपणे पाहत नाहीत. निसर्ग व माणूस आणि माणसामाणसांमधला परस्पर संबंध यांच्याकडे ते एका हुरहुरत्या, 'रोमँटिक' दृष्टीने पाहतात. या हळव्या, काव्यात्म वृत्तीने त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या चित्रणात नागर संवेदना अधिक प्रभावी ठरतात. ग्रामीण जीवनातील कौटुंबिक वास्तव रंगविण्याकडे त्यांचा कल अधिक आहे. पण त्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी

भावभिजली वे आदर्शवादी आहे. त्यामुळे त्याला काहीसे भडक व भावविवश रुप येते. त्याला अधिक गडद व भावूक करणारी त्यांची शैली आहे. तिच्यातील नागर खुणा व अंलकारातून प्रकटणारी व्याज - काव्यात्मता त्यांच्या ग्रामीण आशमाशी विसंवादी वाटते. घटनांमध्ये घटना म्हणून त्यांना रस असल्याचे अनेकदा जाणवते. त्या घटनांना खोल अर्थ देणारी वैचारिकता त्यांच्या कादंब-यात दुबळी ठरते. त्यांच्या कादंब-यात जेव्हा तटस्थ निवेदक येतो, तेव्हा अनुभवापासून ते अकारण दूर जातात असे वाटते, भडक घटना आणि कोमट निवेदन यांची विजोड जोडी जमते. त्यांचा निवेदक प्रत्यक्ष कथा वस्तूत निष्प्रयोजक असल्याने कादंबरीचा बंध एका कच्च्या दुव्याने जोडल्यासारखा वाटू लागतो. कथावस्तुशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या अनेक किश्श्यांनाही तो ढासळतो. हे आकर्षक पण अनावश्यक किस्से म्हणजे कथाकार नलग्यांचे कादंबरीकार नलग्यांवरील आक्रमणच ठरते.

'अगीनफूल' मात्र नलग्यांच्या मर्यादेत जास्तीत जास्त उंची गाठणारी कादंबरी आहे. 'पतिव्रता सावित्रीची करुणोदाय कहाणी ग्रामजीवनाच्या थाटातून आकार घेते. नलग्यांच्या आदर्शवादी मनोधर्माचा बांधा कादंबरीच्या आशय विश्वाशी येथे पक्केपणी जुळला आहे. पांरपारिक मूल्यांचा प्रभावी अविष्कार करणारी ही कादंबरी, बंदिस्त कथानक, आकर्षक, स्थिर व्यक्तिचित्रे आणि संयमी निवेदन यामुळे पकड घेणारी झाली आहे.' (22).

त्यांच्या 'गस्त' या कादंबरीतून दलितांचे केलेले चित्रण दर्शविलेले आहे. या चित्रणातून ग्रामीण संवेदन परिपूर्ण दिसून येते. दलितासह ग्रामजीवन व्यक्तविण्याचा प्रयत्न त्यात आहे.

म्हणून 'दलितांच्या जीवनाचे चित्रण करणारी असूनही ती ग्रामीण कादंबरी मानली पाहिजे. दलित व ग्रामीण यांचे प्रवाह असे परस्परांत मिसळणारे आहेत'. (23).

'शहाळी' आणि 'कपिला' या कादंब-याशिवाय प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी ग्रामीण जीवनावर 'गावाकडची माती', 'चंद्रनबनातल्या सावल्या', हे ललित वाङ:मय प्रसिध्द केलेले आहे. याशिवाय 'हुरडा, रानकस्थंद, सर्जा, अंगाई, आक्रीत, अशीच एक वाट, आणि घुंगराच्या तालावर' हे कथासंग्रह प्रसिध्द केलेले आहेत.

'अंगाई', या कथासंग्रहाचा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. ग्रामीण समाजाचे चिंतन व्यतीत

करणारे 'इथे नांदती रामाची लेकरे' हा बक्षीसपात्र कथासंग्रह प्रसिध्द केला आहे. या सर्व त्यांच्या वाङ:मय साहित्यातून ग्रामीण समाज, ग्रामीण समाजाचे स्वरुप आणि दलितांचे चित्रण स्पष्ट दिसून येते. यावरुन प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे ग्रामीण वाङ:मयीन साहित्यात महत्वाचे स्थान आहे, असेच म्हणावे लागेल. अशा या ग्रामीण व्यक्तित्वाचा जवळून परिचय व्हावा या उद्देशाने त्यांचे जीवन चरित्र अभ्यासणे या शोध निबंधाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. अत्यंत गरीब परिस्थितीत वाढलेले आणि साध्या पध्दतीने राहणारे व ग्रामीण समाजाबद्दल आस्था असणा-या प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या व्यक्तित्वाचा संक्षिप्त परिचय पुढील प्रकरणात करुन दिलेला आहे. या त्यांच्या जीवन चरित्रातून त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय विचारांचा वाङ:मयीन मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| 1. | डॉ. कोत्तापल्ले नागनाथ | : ग्रामीण साहित्य :स्वरुप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - 30, प्रथमावृत्ती, 1985. पृष्ठ - 1 पृष्ठ संख्या. 132. |
| 2. | तत्रैव | : पृष्ठ - 2 |
| 3. | यादव आनंद | : ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या, प्रकाशक अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - 30. पृष्ठ - 6 प्रथमावृत्ती 1979, पृष्ठ संख्या 191. |
| 4. | तत्रैव | : पृष्ठ - 143 |
| 5. | डॉ. कोत्तापल्ले नागनाथ | : ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, उनि, पृष्ठ - 7. |
| 6. | तत्रैव | : पृष्ठ - 14. |
| 7. | यादव आनंद (संपादक) | : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक. प्रकाशक- न.म. जोशी. पृष्ठ - 44 कार्यवाह, म.सा. परिषद, पुणे - 30. पृष्ठ संख्या - 211. |
| 8. | तत्रैव | : पृष्ठ - 13 |
| 9. | डॉ. कोत्तापल्ले नागनाथ | : ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, उनि, पृष्ठ - 7. |
| 10. | तत्रैव | : पृष्ठ - 8 |
| 11. | अत्रे त्रि. ना. | : गावगाडा, ह.वि. मोरे, दादर, मुंबई-14, तृतीयावृत्ति, पृष्ठसंख्या - 216. पृष्ठ - 10 |

| | | |
|---|---|---|
| 12. | डॉ. कोत्तापल्ले नागनाथ | : ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, उनि - पृष्ठ - 11. |
| 13. | तत्रैव | : पृष्ठ - 14 |
| 14. | तत्रैव | : पृष्ठ - 14 |
| 15. | तत्रैव | : पृष्ठ - 15 |
| 16 | तत्रैव | : पृष्ठ - 29 |
| 17. | तत्रैव | : पृष्ठ - 35 |
| 18 | तत्रैव | : पृष्ठ - 35 |
| 19 | तत्रैव | :पृष्ठ - 37 |
| 20 | तत्रैव | : पृष्ठ - 43 |
| 21 | तत्रैव | - पृष्ठ - 83 |
| 22 | यादव आनंद (संपादक) | : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक, उनि, पृष्ठ - 81. |
| 23. | तत्रैव | : पृष्ठ - 84. |

xxxxx